दैनिक
खबरदार पुढारी
नियमित अंक मिळण्यासाठी
आजच संपर्क साधा.
9096200275

दैनिक
# खबरदार पुढारी
वचन निर्भीड पत्रकारितेची
संपादक :-दतात्रय खेमनर मो.नं. whatsapp No. 9096200275

दैनिक
खबरदार पुढारी
नियमित अंक मिळण्यासाठी
आजच संपर्क साधा.
9096200275

श्रीरामपुर वर्ष - ४ • अंक २६२ • बुधवार दि.१५ ऑक्टोबर २०२५ • मुल्ये ३/- • पृष्ठे ४ • MHAMAR 50621 

## रेखा जरे हत्या प्रकरण: बाळ बोठे यांना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर



खबरदार पुढारी

अहिल्यानगर : यशस्विनी महिला ब्रिगेडच्या अध्यक्षा आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्या रेखा जरे यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी पत्रकार बाळासाहेब जगन्नाथ बोठे उर्फ बाळ ज. बोठे यांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. अनेक वर्षे तुरुंगात आणि खटला रखडल्यामुळे जामीन मिळावा, या याचिकेवर न्यायालयाने हा निर्णय दिला. बोठे यांच्या वतीने ॲड. कैलास अवताडे, ॲड. महेश तवले आणि ॲड. संजय दुशिंग यांनी काम पाहिले.

रेखा जरे यांची ३० नोव्हेंबर २०२० रोजी अहमदनगर-पुणे महामार्गावरील जातेगाव घाटात गळा चिरून हत्या करण्यात आली होती. या हाय प्रोफाइल प्रकरणात बाळ बोठे यांच्यावर हत्येची सुपारी दिल्याचा आरोप होता. पोलिस तपासात बोठे आणि जरे यांच्यातील प्रेमसंबंध बिघडल्याने आणि बदनामीच्या भीतीने हा खून घडवल्याचे समोर आले होते. बोठे यांच्यासह अन्य ११ आरोपींना पोलिसांनी अटक केली होती, तर हत्येत वापरलेला चाकू आणि इतर पुरावेही जप्त करण्यात आले होते.हत्येनंतर बोठे सुमारे साडेतीन महिने फरार होते. १३ मार्च २०२१ रोजी हैदराबाद येथील बिलालनगर भागातून त्यांना अटक करण्यात आली. पोलिसांनी अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि सायबर सेलच्या मदतीने त्यांचा शोध घेतला होता. अटकेनंतर बोठे यांनी नगर आणि येरवडा तुरुंगात जीवाला धोका असल्याचा दावा करत नाशिक तुरुंगात हलवण्याची मागणी केली होती. तसेच, त्यांनी अटकेवेळी सुसाइड नोट लिहिल्याचे आणि आजारपणाच्या तक्रारी केल्याचेही समोर आले होते.या प्रकरणात पोलिसांनी दोन दोषारोपपत्रे दाखल केली. पहिले दोषारोपपत्र २६ फेब्रुवारी २०२१ रोजी पाच आरोपींविरुद्ध, तर दुसरे ४५० पानांचे पुरवणी दोषारोपपत्र बोठे आणि इतर सहा जणांविरुद्ध ८ जून २०२१ रोजी पारनेर न्यायालयात दाखल झाले. बोठे यांनी यापूर्वी जिल्हा न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जामीनासाठी अर्ज केले होते, परंतु ते फेटाळले गेले होते.**जामीन मंजुरीचा आधार**बोठे यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत दीर्घकाळ तुरुंगवास आणि खटल्यातील विलंब यावर भर दिला. या मुद्द्यांचा विचार करून सर्वोच्च न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला. यापूर्वी बोठे यांच्यावर खंडणीचा गुन्हाही दाखल झाला होता, ज्यामुळे त्यांचे कथित गुन्हेगारी कृत्य अधिक गंभीर स्वरूपाचे मानले गेले होते. तरीही, कायदेशीर लढाईत त्यांच्या वकिलांनी यश मिळवले.रेखा जरे यांच्या हत्येमागे बोठे यांनी सुपारी दिल्याचे पोलिस तपासात उघड झाले होते. जरे यांनी बोठे यांच्याविरुद्ध पोलिसांत तक्रारी केल्या होत्या, ज्यामुळे त्यांची बदनामी होण्याची भीती होती. या प्रकरणात एकूण ११ आरोपींना अटक झाली होती, आणि बोठे यांना पळून जाण्यास मदत करणाऱ्या व्यक्तींवरही पोलिसांनी कारवाई केली होती.रेखा जरे हत्या प्रकरणाने अहमदनगरसह संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ माजवली होती. जरे यांचा मुलगा रुणाल यांनी बोठे यांना अटकेनंतर व्हीआयपी ट्रीटमेंट मिळत असल्याचा आरोप करत आत्मदहनाचा इशारा दिला होता. तसेच, या प्रकरणाचा पाठपुरावा करणाऱ्या वकिलांनीही पोलिस कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे रेखा जरे हत्या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. बाळ बोठे यांची जामिनावर सुटका झाली असली, तरी या प्रकरणातील कायदेशीर लढाई आणि सामाजिक चर्चा अद्याप संपलेली नाही. हा खटला पुढे काय वळण घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## भाजपा उत्तर आहिल्यानगर जिल्हाध्यक्षाचा मनमानी कारभार थांबवा ?

### भाजपाच्या जुन्या निष्ठावंत पदाधिकाऱ्यांना जिल्हा कार्यकारणी डावल्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत याचा भाजपला फटका बसणार ?

खबरदार पुढारी

भारतीय जनता पार्टी उत्तर अहिल्यानगर जिल्हा अध्यक्षांचा मनमानी कारभार थांबवा? भाजपाच्या निष्ठावंत पदाधिकाऱ्यांना कार्यकारणी मध्ये डावल्याचा स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत पक्षाला फटका बसणार ? श्रीरामपूर प्रतिनिधी - भारतीय जनता पार्टी पक्षांमध्ये गेल्या अनेक वर्षापासून एकनिष्ठपणे काम करणाऱ्या भाजपाच्या जुन्या पदाधिकाऱ्यांना मुळातच काँग्रेस मधून आलेले भाजपाचे उत्तर आहिल्या नगरचे जिल्हाध्यक्ष यांनी आपल्या मागेपुढे व चमकोगिरी करणाऱ्या जवळील लोकांना जिल्हा कार्यकारणी व तालुका कार्यकारणी शहर कार्यकारणी मध्ये समावेश केलेला आहे यामध्ये अकोले राहाता श्रीरामपूर नेवासा मधील अनेक अनुभवी व संघ परिवाराशी जोडलेल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलण्यात आलेआहे भाजपाच्या या जिल्हा अध्यक्षांचे अनेक कारनामे वरिष्ठांपर्यंत पोहोचवण्यात आले आहे मध्यंतरीच्या काळामध्ये या जिल्हाध्यक्षाचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता यावेळी स्वतःचे पद वाचवण्यासाठी अनेक वरिष्ठ नेत्यांचेपाय झीजवले केवळ नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या आशीर्वादामुळे ये पद टिकले नामदारवखे साहेब श्रीरामपूरला आल्यानंतर फक्त मागेपुढे फिरून लोंडा घोळत असणारा हा जल्हाध्यक्ष आहे अशी सर्वसामान्य भाजप कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संतापाची लाट आहे ज्या लोकांना भारतीय जनता पार्टी पक्षातून विधानसभेला पक्षविरोधी काम केलं म्हणून पक्षाने हकालपट्टी केले आहे तोच नकली नेता उघडपणे सभा घेऊन नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वरती सर्रास टीका करत आह येणाऱ्या नगरपालिका निवडणूक मध्ये देखील मीच भाजपचा उमेदवार आहे पत्रकार परिषद घेऊन यांनी घोषणा केली यामुळे श्रीरामपूर शहरातील नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे एकीकडे लोकं त्या नकली नेत्याला पक्षातून हकालपट्टी झाल्याचे बोलतात दुसरीकडे तो नेता खुलेआम शहरातील फ्लेक्स बोर्ड वरती भाजपाचे पंतप्रधान मुख्यमंत्री यांचे फोटो भाजप पक्षाचा लोगो टाकून फ्लेक्स लावतो खरंतर या संदर्भात भाजपाच्या जिल्हाध्यक्षांनी या नकली हिंदुत्ववादी नेत्याला उत्तर देणे अपेक्षित आहे परंतु जिल्हाध्यक्षांमध्येया नकली नेत्याला उत्तर देण्याची धमक नाही अशी श्रीरामपुरात नागरिक खाजगी चर्चा करतातजिल्हाध्यक्ष भारतीय जनता पार्टी पक्षाचा आहे परंतु याचे काँग्रेस व इतरही विरोधी पक्षाशी काही नेत्यांसोबत छुपे संबंध आहे मुळात हा जिल्हाध्यक्ष बाहेर तालुक्यातून येऊन श्रीरामपूर मध्ये आपला राजकीय वरदहस्त निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे पण तो त्यामध्ये पाहिजे तेवढा यशस्वी होत नाही श्रीरामपूर ची जनता खूप हुशार आहे कोणाला किती पर्यंत ठेवायचं हे श्रीरामपूरकरांना चांगलं माहित आहे भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी या जिल्हाध्यक्षावरती जबाबदारी देऊन उत्तर आहिल्या नगरची भाजप कमकुवत केली आहे या संदर्भात काही भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी नामदार राधाकृष्ण विखे पाटील व प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे तक्रार केलेली आहेयेणाऱ्या नगरपालिका जिल्हा परिषद पंचायत समितीया निवडणुकीमध्ये या जिल्हा अध्यक्षाच्या कार्यपद्धतीचा सर्वात जास्त फटका भारतीय जनता पार्टी पक्षाला होणार आहे निष्ठावंतांना पदावरून डावलने त्यामुळे अनेक ठिकाणी हे निष्ठावंत पदाधिकारी बंडखोरी करण्याची शक्यता आहे त्यामुळे भारतीय जनता पार्टी पक्षाच्या उमेदवाराला याचा फटका बसू शकतो अनेक जाती समूहाचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांनाठरवून पदापासून डावल्यामुळेत्यासमूहामध्ये देखील या जिल्हाध्यक्ष बद्दल प्रचंड राग आहेत्यामुळे तो समूह जात देखील भारतीय जनता पार्टी पक्षाच्या विरोधात मतदान करू शकतेया सर्व गोष्टीला हा जिल्हाध्यक्ष जबाबदार असणार आहेहे भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ नेत्यांच्या निर्दर्शनास येणे खूप गरजेचे आहे त्यामुळे भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ नेत्यांनी या जिल्हाध्यक्ष ला वेळीच आवर घालावा अन्यथा उत्तर आहिल्या नगर भाजपामध्ये मोठा उद्रेक होण्याची शक्यता आहे अशी सर्वसामान्य भारतीय जनता पार्टीच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये भावना आहे

## रा.स्व.संघाच्या शाखेवर दगडफेक.. पोलिसांची गप्प बसण्याची भुमिका..

खबरदार पुढारी

श्रीरामपूर शहरातील झिरंगे नगर मध्ये संत तुकाराम महाराज मंदिराच्या प्रांगणात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शाखा भरते.शाखेमध्ये खेळ होतात,व्यक्तींनिर्माणाचे कार्य होते.नित्यनेमाने परिसरातील सर्व स्वयंसेवक शाखेला येतात.यंदाच वर्ष संघाचं शताब्दी वर्ष असल्याने विविध उपक्रमाचे नियोजन देखील या परिसरात होत आहे.हेच संघटन होत दिसतांना या समाजकंटकांना देखवत नाही.

सोमवारी शाखा सुटल्यावर स्वयंसेवक संत तुकाराम महाराज मंदिरात हनुमान चालीसा पठन करत असतांना ५ ते ६ समाजकंटकांनी तेथे येऊन अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज,छत्रपती संभाजी महाराज यांच्या विषयी अशब्द वापरून सामाजिक आणि धार्मिक



तेढ निर्माण करण्याच्या हेतूने स्वयंसेवकांवर शिवीगाळ व दगडफफेक करून मिल्लतनगरच्या दिशेने पळ काढला.यावर श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.यापूर्वी देखील हा प्रकार घडला होता यावर पोलिसांना कार्यवाहीचे निवेदन देवून देखील पोलिसांनी बघायची भुमिका घेतली.पोलीस प्रशासन शांत का? असा प्रश्न हिंदू समाजाकडून विचारला जातोय.

काल रा. स्व. संघाची नित्य शाखा होऊन संत तुकाराम महाराज मंदिरात हनुमान चालीसा पठन झाले .याला मोठ्या संख्येने हिंदू समाज उपस्थित होता.मागील तीन दिवसापासून मंदिर परिसरातील काही हिंदू घरावरती संध्याकाळच्या वेळेत दगड फेक होत आहे अशी तोंडी तक्रार पोलीस निरीक्षका कडे स्थानिकानी दिलेली आहे.यावर पोलिसांनी जर आरोपी पकडून त्यांना कठोर शासन केले नाही तर सकल हिंदू समाज गप्प बसणार नाही असा इशारा दिला.

## मतदारयादी कशा साठी लपवताय? मतदार नोंदणी बंद करून ही लपवाछपवी का ?: राज ठाकरेंचा सवाल

खबरदार पुढारी

आगामी स्थानिक स्वराज संस्था तसेच मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी च्या शिष्टमंडळाकडून सलग दुसऱ्या दिवशी निवडणूक आयोगा ची भेट घेऊन प्रश्नांची सरबत्ती करण्यात आली. मनसे अध्यक्ष राज ठाकरे, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आयोगावर प्रश्नांची सरबत्ती केली. मतदारयादी कशा साठी लपवताय? मतदार नोंदणी बंद करून ही लपवाछपवी का करताय अशी विचारणा राज यांनी केली. यावेळी काही प्रश्नांची उत्तरे देताना आयोगाची अधिकारी निरुत्तर झाल्याचे दिसून आले. राज ठाकरे यांनी बाळासाहेब थोरात गेल्या आठ टर्मपासून ८० ते ९० हजार मतांनी निवडणूक जिंकत असताना यंदा लाखाने कसे पडले ? हे कसे शक्य असल्याचे विचारताच आयोगाच्या अधिकारी निरुत्तर झाल्याचे दिसून आले. आयोगाला भेटलेल्या शिष्टमंडळामध्ये उद्धव




ठाकरे, राज ठाकरे, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, शेकापचे जयंत पाटील, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, रईस शेख, अनिल परब, अनिल देसाई, अजित नवले उपस्थित होते. आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे सुद्धा उपस्थित होते. यावेळी शिष्टमंडळाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक पारदर्शक पद्धतीने पार पाडाव्यात अशी मागणी करण्यात आली. यावेळी बोलताना राज ठाकरे यांनी आयोगाला चांगलं सुनावलं. ते म्हणाले की आमचं तुमचं करत बसू नका आमच्यासाठी निवडणूक आहे एकच आहे. जोपर्यंत राजकीय पक्षांचे एकमत होत नाही तोपर्यंत निवडणूक घेऊ नका, अशी मागणी त्यांनी केली. सत्तेतील तीन पक्षांसाठी तुम्ही काम करत नाही, असे म्हणत त्यांनी आयोगाला टोला लगावला. मतदान नोंदणी बंद करून लपवा छपवी कशासाठी करत आहात? निवडणुका राजकीय पक्ष लढव तात, तर राजकीय पक्षांना शेवटची मतदार यादी का दाखवली जात नाही?अशी विचारणा त्यांनी केली.दुसरीकडे, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सुद्धा आयोगाची झाडाझडती घेतली. जर त्रुटींसह निवडणुका घ्यायच्या असतील तर निवडणुका घ्यायच्या कशाला डायरेक्ट इलेक्शन फॉर सिलेक्शन करून टाका, असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला. चोक्कलिंगम म्हणाले, काही जबाबदारी आमच्याकडे नाही म्हणते, राज्य निवडणूक आयुक्त आमच्याकडे काही जबाबदारी आमच्याकडे नाही म्हणते, मग आम्ही कोणाशी बोलू? अशी विचारणा उद्धव ठाकरे यांनी केली. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी सुद्धा आयोगाला सवाल केले. ते म्हणाले की आम्ही विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान ज्या त्रुटी सांगितल्या होत्या त्यावर काम झालेलं नाही आता स्थानिक स्वराज्य निवडणुका होत आहेत, त्या बाबतही अनेक तक्रारी असल्याचे बाळासाहेब थोरात म्हणाले.

## कौशल्य वापरुन महिलांनी व्यवसाय वाढवावा : धनश्री विखे

### उद्योजकता विकास कार्यशाळा उत्साहात

खबरदार पुढारी

लोणी शेतीक्षेत्रात महिलांचा सहभाग वाढत आहे. महिलांच्या माध्यमातून विविध बचतगटांची स्थापना ही होत आहे. या बचतगटातील महिलांना विविध कौशल्यांची गरज आहे. ते कौशल्य देण्याचे काम बाभळेश्वरच्या कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून होत आहे. उद्योजकता विकास कार्यशाळा महिलांसाठी आणि शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरेल आणि यातून मिळालेल्या माहिती तून उद्योजकता वाढीस लागेल, असे प्रतिपादन रणरागिनी महिला मंडळाच्या अध्यक्षा धनश्री विखे पाटील यांनी केले.कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर आणि सी उद्यमी फाउंडेशन (नाशिक) यांच्यासंयुक्त विद्यमाने सूक्ष्म आणि लघु उद्योग मंत्रालयांतर्गत एक दिवशीय उद्योजकता विकास कार्यशाळा प्रधानमंत्री धनधान्य योजना लोकार्पण कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. उत्तमराव कदम, श्री उद्यमी फाउंडेशनच्या दीपाली चांडक, योगिता देशपांडे, स्वाती




शहा तसेच कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख, मृदा विभाग प्रमुख शांताराम सोनवणे, उद्यान विद्या विभागाचे डॉ विलास घुले, गृह विज्ञान विभागाच्या सज्जला लांडगे, विस्तार विभागाच्या डॉ. प्रियंका खर्डे, डॉ. विठ्ठल विखे आदीसह महिला आणि शेतकरी उपस्थित होते. जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, शालिनीताई विखे पाटील यांच्या प्रेरणेने संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे, डॉ. कदम, पायरेन्सचे सचिव डॉ. निलेश बनकर यांच्या मार्गदर्शना खाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. डॉ. कदम म्हणाले की, शेतकऱ्यांनी विविध योजना समजून घेत पुढे जाण्याची गरज आहे. कृषी विज्ञान केंद्र आणि प्रवरा कृषी शास्त्र संस्थेच्या माध्यमातून मंत्री विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी, महिला युवक-युवती, कृषी उद्योजक यांच्यासाठी विविध तंत्रज्ञान देण्याचे काम होत आहे. विविध कौशल्य प्रदान करण्यासाठी प्रवरा कायमच आपल्यासाठी तत्पर असते. हे कौशल्य समजून घेत शेतकऱ्यांनी पुढे जावे. शेतीक्षेत्रामध्ये समस्या असल्या तरी त्या समस्या सोडवण्याचे काम शेतकऱ्यांनी करताना नवतंत्रज्ञान अवगत करून विविध शासकीय योजनेचा लाभ घेत पुढे जाण्याची गरज डॉ. कदम यांनी व्यक्त केली. महिलांना उत्पादननिर्मितीबरोबरच विविध कौशल्य प्रदान करण्याच्या दृष्टीने ही कार्यशाळा महत्वपूर्ण ठरेल असेही त्यांनी नमूद केले. सूत्रसंचालन करून डॉ. प्रियंका खर्डे यांनी आभार मानले.

# दिवाळीपूर्वी शिक्षकांना वेतन मिळण्यासाठी जिल्हा परिषदेत शिक्षकांचे धरणे आंदोलन

खबरदार पुढारी

अहिल्यानगर (प्रतिनिधी)- दिवाळीच्या तोंडावर पोस्ट मॅपिंगच्या तांत्रिक अडचणीमुळे शालार्थ प्रणालीत वेतन थांबण्याचा धोका निर्माण झाला होता. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर समन्वय समितीच्या वतीने मंगळवारी (दि. १४ ऑक्टोबर) जिल्हा परिषद समोर माध्यमिक शिक्षण विभागाच्या कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनानंतर शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनी सर्व कामकाज एका दिवसात पूर्ण करून दिवाळीपूर्वी शिक्षकांचे वेतन खात्यात जमा होईल, असे आश्वासन दिले. शालार्थ प्रणालीतील संच मान्यता, मॅपिंग स्टेटस आणि ऑथरायझेशन संदर्भात अनेक शाळांना तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. यामुळे ऑक्टोबर २०२५ चे वेतन देयके फॉरवर्ड करण्यात अडथळे आले. दिवाळीसारख्या सणाच्या काळात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वेतनापासून वंचित राहू नयेत म्हणून आंदोलक शिक्षकांनी आक्रमक पवित्रा घेतला होता.

शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड उपशिक्षणाधिकारी संध्या भोर यांच्या मार्गदर्शनाखाली वेतन पथक अधीक्षक रामदास म्हस्के आणि कार्यालय अधीक्षक दोधाड यांनी आंदोलकांशी चर्चा केली. दोघांनीही दिवाळीपूर्वी सर्व कामकाज पूर्ण करून शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन खात्यात जमा करण्यात येईल, असे स्पष्ट आश्वासन दिले.

या आंदोलनाचे नेतृत्व प्राचार्य सुनिल पंडित (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ), आप्पासाहेब शिंदे (अध्यक्ष, माध्यमिक शिक्षक संघटना व सोसायटी चेअरमन), बाबासाहेब बोडखे (जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद), विठ्ठल उरमुडे (राज्य सचिव, खाजगी प्राथमिक शिक्षक महासंघ), ज्ञानदेव बेरड (शहराध्यक्ष मुख्याध्यापक संघ), शिवाजीराव घाडगे (सचिव शहर मुख्याध्यापक संघ), वैभव सांगळे (अध्यक्ष, भाजप शिक्षक सेल), दिलीप काटे (माजी चेअरमन, सोसायटी), शेखर उंडे, बाळासाहेब राजळे, जाकीर सय्यद, आर.एस. औताडे आदींनी केले. या आंदोलनात मोठ्या संख्येने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. प्रशासनाने दिलेले आश्वासन लवकरात लवकर पूर्ण व्हावे, अशी शिक्षकवर्गानी अपेक्षा व्यक्त केली आहे.



## रेल्वे उड्डाणपुलाजवळील दुकानास शॉर्टसर्कीटने आग लाखोचे नुकसान



खबरदार पुढारी

शिरसगाव (वार्ताहर) - श्रीरामपूर नेवासा रोडवरील रेल्वे उड्डाण पुलाजवळील भवानी ट्रेडर्स या दुकानास सोमवारी सायंकाळी ७.३० वाजता अचानक शॉर्टसर्कीटने आग लागली. यामध्ये सदर दुकानदाराचे जवळपास ७ ते ८ लाखाचे नुकसान झाले आहे. स्थानिक नागरिकांच्या मदतीने तसेच श्रीरामपूर नगर पालिकेच्या अग्निशामन बंबाच्या सहाय्याने आगीवर नियंत्रण मिळिवण्यात यश आले. या दुकानाच्या केबिनला प्रथम आग लागली. केबिनमध्ये ऑईल पेन्टचे डबे असल्याने आग भडकली व त्याजवळ असलेल्या हार्डवेअर साहित्याला आगीची झळ बसली. या आगीत जवळपास २० टक्के नुकसान झाले असल्याचे दुकान मालकांनी सांगितले.

## मनपाची प्रभाग रचना, आरक्षण जाहीर करण्यास विलंब का? मनमानी पद्धतीने प्रभागांची तोडफफोड करू देणार नाही

### शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव यांचा इशारा

खबरदार पुढारी



अहिल्यानगर :अहिल्यानगर महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील बहुतांश महानगरपालिकांची प्रभाग रचना आणि आरक्षण रचना जाहीर करण्यात आली असताना, अहिल्यानगर महानगरपालिकेची प्रभाग रचना मात्र मुदत संपूनही जाहीर झालेली नाही. त्यामुळे शहरात प्रभाग रचनेवरून वाद निर्माण झाला असून, या प्रकरणामागे राजकीय हस्तक्षेप असल्याचा आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाने केला आहे.

शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव यांनी या संदर्भात पत्रकारांशी बोलताना सांगितले की, महानगरपालिकेतील सत्ताधाऱ्यांनी आपल्या उमेदवारांना सोयीस्कर ठरतील अशा पद्धतीने प्रभागांचे फेरबदल केले आहेत. निवडणूक आयोगाने ठरविलेल्या मुदतीनंतरही मनपात रचना बदलण्याचे प्रकार सुरू आहेत, हे गंभीर आहे.ते पुढे म्हणाले, मागील निवडणुकीत प्रभाग रचना आयताकृती आणि आडव्या पद्धतीची होती. पण यावेळी झेंडीगेटपासून नालेगावपर्यंत एकच वॉर्ड बनविण्यात आला असून, ज्या भागांतील रहिवाशांचा एकमेकांशी संबंधच नाही, अशा क्षेत्रांना कृत्रिमरीत्या एकत्र करण्यात आले आहे. दलित वस्त्यांची विभागणी करून त्या वेगळ्या प्रभागात जोडण्यात आल्या आहेत. महामार्ग, उड्डाणपूल, नदीकाठाचे भागसुद्धा विभागले गेले असून, हे नियोजन विरोधी पक्षातील उमेदवारांना गैरसोयीचे ठरावे म्हणून केलेले स्पष्ट दिसते.जाधव यांनी आरोप केला की, ही संपूर्ण रचना भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवसेना (एकनाथ शिंदे गट) यांच्या सल्लामसलतीतून आखण्यात आली आहे. त्यामुळे ही प्रक्रिया पूर्णपणे बेकायदेशीर असून, लोकशाही आणि न्यायाच्या तत्त्वांना विरोध करणारी आहे. आम्ही या अन्यायाविरुद्ध न्यायालयात जाणार आहोत.

यासंदर्भात शिवसेना (उबाठा) गटाने मनपा आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना निषेधपत्र देण्याची घोषणा केली आहे. तसेच प्रभाग रचनेतील अन्यायकारक फेरबदलाविरोधात निवडणूक आयोगाकडे आणि न्यायालयात दाद मागण्याचा इशारा दिला आहे.

जाधव यांच्या प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग रचना सर्व पक्षांसाठी समान न्यायाच्या तत्त्वावर केली गेली पाहिजे. पण सध्याची रचना लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांवर घाला घालणारी आहे. आम्ही हे कोणत्याही परिस्थितीत होऊ देणार नाही.

## मयताच्या प्रेयसीने प्रियकर सोबत राहत नसल्याच्या कारणावरुन केला खून




खबरदार पुढारी

संगमनेर :तालुक्यातील मांडवे बुद्रुक येथील शिवप्रभा ट्रस्टमध्ये एका तरुणाचा १२ ऑक्टोबर रोजी मृतदेह आढळून आला होता. या प्रकरणाचा उलगडा करण्यात घारगाव पोलिसांना यश आले असून, मयताच्या प्रेयसीने प्रियकर सोबत राहत नसल्याच्या कारणावरुन खून केला असल्याचे उघड झाले आहे.

या घटनेनंतर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे, घारगावचे सहायक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात, पोलीस उपनिरीक्षक अजय कौटे, आदिनाथ गांधले, पोहेकॉ. दत्तू चौधरी, पोकॉ. सुभाष बोडखे, प्रमोद गाडेकर, महादेव हांडे, महिला पोकॉ. अमृता नेहरकर असे घटनास्थळी दाखल झाले. श्वानपथक, फिंगर प्रिंट, फॉरेंसिक यूनिट पाचारण करण्यात आले होते.

प्रेताची ओळख पटवत असताना ते भाऊसाहेब विठ्ठल बाचकर (रा. जांभुळबन, ता. राहुरी) याचे असल्याचे समजले. त्यानंतर मयत भाऊसाहेबची पत्नी व नातेवाईक यांच्याकडे विचारपूस करता त्यांनी सांगितले, की भाऊसाहेब बाचकर व जयश्री काकासाहेब चव्हाण (रा. काटेपिंपळगाव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) यांच्यामध्ये मागील तीन वर्षांपासून प्रेमसंबंध असल्याने तेव्हापासून दोघेही अहिल्यानगर येथे राहत होते.दरम्यान, ११ ऑक्टोबर रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास भाऊसाहेब हा पत्नी व मुलाबाळांना भेटण्यासाठी साकूर येथे आला होता. तेव्हा त्याच्यासोबत जयश्री देखील होती. तेव्हा पत्नी योगिता बाचकर हिस साकूर येथे बोलावून घेवून सांगितले, मला आता जयश्री सोबत राहायचे नाही. यापुढे तुझ्या सोबत राहणार आहे. याचा राग आल्याने जयश्री भाऊसाहेब यास म्हणाली, तुम्हांला माझ्यासोबत राहावे लागेल नाहीतर मी तुम्हांला जीवे ठार मारेन, अशी धमकी दिली. त्यानंतर भाऊसाहेब यास जयश्री ही मोटारसायकलवरुन घेवून शिवप्रभा ट्रस्ट येथे गेली. त्यानंतर तिने टणक हत्याराने त्याच्या डोक्यावर वार करुन खून करुन पसार झाली होती.तपास करताना पोलीस उपनिरीक्षक अजय कौटे, पोकॉ. सुभाष बोडखे, प्रमोद गाडेकर व महिला पोकॉ. अमृता नेहरकर यांच्या पथकाला जयश्री काकासाहेब चव्हाण हिने तिचे पती काकासाहेब शंकर चव्हाण यास फोन करुन नेवासा फाटा येथे बोलविले असल्याची माहिती मिळाली. त्यावरुन सदर ठिकाणी जावून तिला ताब्यात घेण्यात आले असता तिने गुन्ह्याची कबुली दिली.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शानाखाली सहायक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात, पोलीस उपनिरीक्षक अजय कौटे, आदिनाथ गांधले, पोहेकॉ. दत्तू चौधरी, पोकॉ. सुभाष बोडखे, प्रमोद गाडेकर, महादेव हांडे, महिला पोकॉ. अमृता नेहरकर, अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोना. सचिन धनाड यांनी केली.

# माता रमाबाई आंबेडकर व कामराज नगर झोपडपट्टीतील रहिवाशांचे स्वतःच्या घरांत राहण्याचे स्वप्न दोन वर्षात पूर्ण होणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



खबरदार पुढारी

मुंबई, दि. १४ : समूह विकासाच्या माध्यमातून झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनाचे काम हाती घेतले आहे. या माध्यमातून झोपडपट्टीधारकांना सुंदर व सर्व सुविधायुक्त असे घर मोफत देण्याचे काम शासनाच्या माध्यमातून होणार आहे. कुणालाही विकास आणि घरापासून वंचित राहू देणार नाही, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. रमाबाई आंबेडकर व कामराज नगर झोपडपट्टीतील रहिवाशांचे स्वतःच्या घराचे स्वप्न केवळ कागदावर राहणार नाही तर दोन वर्षांत या परिसरात आधुनिक, सुसज्ज घरे उभी राहतील,ङ्घ असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.मुंबई महानगर प्रदेशातील माता रमाबाई आंबेडकर नगर व कामराज नगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, राज्यमंत्री पंकज भोयर, खासदार संजय दिना पाटील, आमदार राम कदम, पराग शहा, मिहिर कोटेचा, माजी नगरसेवक परमेश्वर कदम आणि स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

### पहिल्यांदाच शासकीय संस्थांच्या माध्यमातून पुनर्विकास प्रकल्प

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गेल्या ४५ वर्षांपासून विदारक परिस्थितीत राहणाऱ्या रमाबाई आंबेडकर व कामराज नगरमधील नागरिकांच्या स्वप्नातील पुनर्विकास प्रकल्पाचा शुभारंभ झाला आहे. यासंदर्भात अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरू होते. विकासकांच्या गुंतागुंतीपासून दूर राहून, हे काम थेट शासकीय संस्थांकडून करायचा निर्णय शासनाने घेतला. एसआरए आणि एमएमआरडीए यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प साकारला जात असून पहिल्यांदाच एमएमआरडीए व एसआरए यांना संयुक्तपणे या प्रकल्पासाठी जोडण्यात आले आहे. राज्य सरकारने दोन वर्षांचे आगाऊ भाडे देऊन येथील नागरिकांना तात्पुरत्या निवासाची सोय करून दिली आहे. आता एमएमआरडीए आणि एसआरए यांनी दोन वर्षांतच हे बांधकाम पूर्ण करावे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समूह पुनर्विकासाची संकल्पना मांडली. त्यांची ही संकल्पना पुढे नेत मुंबईसाठी मोठ्या प्रमाणात समूह पुनर्विकास धोरणास शासनाने मंजुरी दिली आहे. या योजनेद्वारे झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या लोकांना फक्त घरच नाही, तर खेळाचे मैदान, जिम, शाळा, आरोग्य केंद्र अशा सर्व सोयीसुविधा देऊन पुनर्वसन केले जाईल. यातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समतेच्या विचाराची खरी अंमलबजावणी होईल. नफा कमी झाला तरी चालेल परंतु समूह पुनर्विकासाच्या माध्यमातून झोपडपट्टी विकास करणार आहोत. यासाठी ५० एकरांचे क्लस्टर शोधून ठेवले आहेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.समूह पुनर्विकासाच्या माध्यमातून मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्याचे काम आमचे सरकार करत आहे. झोपडपट्टीत राहणाऱ्या बांधवांना सुंदर घराबरोबरच विविध सुविधा पुरविण्याचे काम राज्य शासन हाती घेतले आहे. मुंबईतील सर्वात मोठी झोपडपट्टी असलेल्या धारावीचा पुनर्विकास येत्या सात वर्षांत पूर्ण होणार असून येथील सुमारे १० लाख कुटुंबांना त्यांच्या हक्काचे घर मिळणार आहे. त्याचबरोबर येथील दोन लाख कारागिरांना याच ठिकाणी त्यांच्या कारखान्यासाठी जागा देण्यात येणार आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने सांगितलेल्या शेवटच्या माणसाच्या भल्याचा विचार डोळ्यासमोर ठेवून आम्ही काम करत आहोत. हे सरकार समाजाच्या विकासाचा विचार करणारे आहे. विकासाने रोजगार निर्माण होतो. त्यामुळे सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन होते. ते करण्याचे काम आमचे सरकार करत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.पुढील दोन वर्षांत रमाबाई आंबेडकर नगर आणि कामराज नगर येथे आधुनिक, सुसज्ज इमारती उभ्या राहतील. या उद्घाटनावेळी पुन्हा आम्हीच उपस्थित राहू, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### रमाबाई नगरमध्ये आता 'माता रमाबाई आंबेडकरांचे' स्मारक उभारणार - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासोबतच आता त्यांच्या सहचारिणी माता रमाबाई आंबेडकर यांचे स्मारक देखील उभारले जाणार आहे. रमाबाई नगरातील क्लस्टर पुनर्विकास योजनेतून हे स्मारक उभारले जाईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, गेल्या ४०-४५ वर्षांपासून येथील लोक कठीण परिस्थितीत जगत आहेत. आज त्यांचा खडतर प्रवास संपला आहे. पुढील तीन-चार वर्षांत १७ हजार कुटुंबांचे आयुष्य उजळून निघेल. दिवाळी पुढच्या आठवड्यात असली तरी या रहिवाशांची खरी दिवाळी आजच साजरी झाली आहे.

या योजनेचा प्रयत्न पंधरा वर्षांपासून सुरू आहे. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या काळात सुरुवात झाली, मात्र गती देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात मिळाली. मुख्यमंत्री म्हणून मी या योजनेला पुढे नेले. येथे कोणताही खाजगी बिल्डर नाही; एमएमआरडीएच हा प्रकल्प राबवत आहे. त्यामुळे दर्जेदार घरे वेळेत मिळतील, याची मी खात्री देतो. मी मुख्यमंत्री असताना भाडे वाटपाचे चेक देण्यासाठी आलो होतो. दीडशे कोटी रुपयांचे चेक दिले, त्यानंतर रहिवाशांचा विश्वास बसला की घरे नक्की मिळतील, असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

### प्रकल्पामुळे स्वाभिमानाचे नवे पर्व सुरू - उपमुख्यमंत्री अजित पवार



उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, रमाबाईनगर आणि कामराज नगर हा परिसर म्हणजे केवळ झोपडपट्टीचा समूह नाही, तर ही जागा संघर्ष, आत्मसन्मान आणि जिद्दीची साक्षीदार आहे. देशाची आर्थिक राजधानी असणाऱ्या मुंबईच्या विकासात इथल्या कामगार, कष्टकरी बंधू-भगिनींच्या श्रमाचा आणि घामाचा मोठा वाटा आहे. हा परिसर महाराष्ट्रातील सामाजिक जागृतीचा, परिवर्तनाचा आणि चळवळींचा एक सशक्त केंद्रबिंदू राहिला आहे. माता रमाई आणि के. कामराज यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या भागात आज या प्रकल्पामुळं स्वाभिमानाचं नवं पर्व सुरू होत आहे.

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या ङ्गदि पिपल्स एज्युकेशन सोसायटीङ्घ अंतर्गत कार्यरत असलेल्या नऊ शैक्षणिक संस्था आणि दोन वसतिगृहांच्या इमारतींच्या जतन, जिर्णोद्धार आणि संवर्धनासाठी राज्य सरकारने स्वतंत्र योजना तयार करण्यास मान्यता दिली आहे. दरवर्षी १०० कोटी रुपये असे पुढील पाच वर्षांसाठी एकूण ५०० कोटी रुपयांचा निधी या योजनेअंतर्गत उपलब्ध करून देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. हा निर्णय भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या कार्याला वंदन करणारा आणि समाजातल्या दुर्बल घटकांना बळ देणारा ठरेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.एमएमआरडीएचे आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी प्रास्ताविकात प्रकल्पाची माहिती दिली. झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर यांनी आभार व्यक्त केले.

# जीवनातील सुखासाठी शिवभक्तीचा मार्ग स्वीकारा

## शिवमहापुराण कथेला शिवभक्तांचा अथांग सागर

खबरदार पुढारी

राहाता तालुका प्रतिनिधी मृत्यूलोकात जन्म घेतलेल्या प्रत्येकाला आपल्या कर्माचे भोग भोगावेच लागतात. त्यामुळे वाईट कर्म टाळून, जीवनात सुख आणि शांती मिळवण्यासाठी शिवभक्तीचा मार्ग स्वीकारा, असे मोलाचे प्रतिपादन प्रसिद्ध कथावाचक पंडित प्रदीप मिश्रा यांनी शिर्डीजवळील अस्तगाव पिंपरी निमर्ळ शिवेवर सुरू असलेल्या शिवमहापुराण कथेच्या तिर्सया दिवशी केले.जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पुढाकाराने या शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. तिर्सया दिवशी कथेला उपस्थित शिवभक्तांनी गर्दीचा उच्चांक गाठला.पंडित मिश्रा यांनी यावेळी शिवकथेचा महिमा, एका तांब्या पाण्याने केलेल्या जलाभिषेकाचे महत्त्व, तसेच माता पार्वतीची आराधना, हरतालिका व्रत आणि शिव-पार्वती विवाहावर सखोल भाष्य केले. पंडित मिश्रा म्हणाले, शिवमहापुराण कथा ऐकण्यासाठी मंडपात बसलेल्यांनी भगवंतावर पूर्ण विश्वास ठेवला पाहिजे. कथा ऐकताना मनात कोणतेही वाईट विचार आणू नका. सर्वांचे कल्याण होईल, असाच विचार करा. भक्तीमध्ये समर्पण भावना असावी. जर तुम्ही समर्पित भावनेने शिवभगवंताला एक तांब्या पाण्याचा जलाभिषेक केला, तर तो तुम्हाला सर्व संकटातून तारेल.यावर त्यांनी गवताच्या काडीचे उदाहरण दिले. समुद्र मोठमोठी जहाजे बुडवतो, पण एक गवताची काडी सहज तरंगते, कारण ती समर्पित भावनेने असते. त्याचप्रमाणे, भगवंतावर पूर्ण विश्वास असेल तर जग तुम्हाला बुडवू शकत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. जीवनातील दुःख, आजार आणि चिंता दूर करायच्या असतील, तर शिवालयात जाऊन बसा, आई-वडिलांच्या जवळ बसा किंवा सद्गुरूंच्या पायाजवळ वेळ घालवा. मानवी शरीरात चुकीच्या गोष्टी टाकू नका. दारू आणि इतर व्यसनांपासून दूर राहा. जर नशा करायचीच असेल, तर ती शिवनामाची करा, असे आवाहन करत पंडित मिश्र यांनी 'शिवनाम होठो पे चढ गया रे!' हे भजन सादर केले. या भजनावर संपूर्ण कथास्थळ थिरकले.पंडित मिश्र यांनी सांगितले, आपल्या मुलांना खूप मेहनत करण्याचा आणि शिवमंदिरात जाऊन एक तांब्या पाण्याचा जलाभिषेक करण्याचा सल्ला द्या. हरतालिका व्रताचे महत्त्व सांगताना त्यांनी हे व्रत मुलींपासून वृद्धांपर्यंत सर्वजणी करतात असे सांगितले. व्यासपीठाजवळ शिव-पार्वती विवाह सोहळ्याचा जिवंत देखावा सादर करण्यात आला. कालच्या कथेला रमेशगिरी महाराज, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषद माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, धनश्रीताई विखे पाटील, ध्रुव विखे पाटील, श्रीरामपूरच्या माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, राहाता बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर यांच्यासह राज्यभरातील लाखो भाविक



उपस्थित होते.जिल्ह्यासह राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक कथेला आले असले तरी, जनसेवा फाउंडेशनने केलेल्या उत्कृष्ट नियोजनामुळे कोणाचीही गैरसोय झाली नाही. माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील स्वतः सर्व व्यवस्थेवर नियंत्रण ठेवत आहेत. आज बुधवारी कथा दुपारी १ ते ४ या वेळेत असेल, तर उद्या गुरुवारी सकाळी ८ ते ११ या वेळेत कथेची सांगता होणार आहे.विखे पाटलांनी अध्यात्मिक 'यज्ञा' चे पुण्य मिळवून दिले

**पंडित मिश्रांनी शिवमहापुराण कथेतील उत्कृष्ट नियोजनाची प्रशंसा केली**

शिर्डीजवळील अस्तगाव पिंपरी निमर्ळ शिवेवर सुरू असलेल्या पंडित प्रदीप मिश्रा यांच्या शिवमहापुराण कथेला भाविकांची विक्रमी गर्दी होत असून, या गर्दीच्या नियोजनाबद्दल विखे पाटील परिवाराचे मोठे कौतुक होत आहे. कथावाचक पंडित प्रदीप मिश्रा यांनी स्वतः विखे परिवाराच्या व्यवस्थापनाचे तोंडभरून कौतुक केले.कथेच्या दुर्सया दिवशी बोलतांना पंडित मिश्रा म्हणाले, विखे पाटील परिवाराने कार्तिक महिन्यात शिवमहापुराण कथेचे आयोजन करून भाविकांना अध्यात्मिक यज्ञ चे पुण्य मिळवून दिले. त्यांच्या या विधानाने हा आध्यात्मिक यज्ञ प्राचीन काळातील धार्मिक आणि राजकीय यज्ञाप्रमाणेच भव्य असल्याचे दिसून आले. पंडित मिश्रांनी पुढे सांगितले की, विखे परिवाराच्या चार पिढ्यांना जनतेचा आशीर्वाद लाभला आहे. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वाखालील या आयोजनामुळे लाखो भाविकांना दिव्य अनुभव मिळत आहेत.धर्म, समाज, राजकारण आणि आयोजन या सर्व क्षेत्रांत डॉ. सुजय विखे पाटील यांनी उत्तम समतोल साधला असून, त्यांच्या भक्तिभावामुळे त्यांना भाविकांचे प्रेम मिळाले आहे. कथेच्या यशस्वी नियोजनामुळे डॉ. सुजय विखे यांच्या नेतृत्वगुणांची नवी झलक दिसून आली आहे. या आयोजनामुळे शिर्डी परिसरात अभूतपूर्व श्रद्धा आणि शिस्तीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## अध्यात्मिक यज्ञाचा संदर्भ आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे कौतूक

शिर्डी:शिर्डीजवळील अस्तगाव शिवारात उभारलेल्या शिवनगरीत सुरु असलेल्या शिवमहापुराण कथेने सध्या अहिल्यानगर जिल्ह्यांसह विविध ठिकाणांहून येत असलेल्या भक्तांना वेड लावले आहे. पाच दिवस चालणाऱ्या या कथेचे प्रवचन प्रसिद्ध कथाकार सिहोरवाले बाबा अर्थात पंडीत प्रदीप मिश्रा देत आहेत. लाखोंच्या भाविकांच्या उपस्थितीमुळे दररोज गर्दीचा उच्चांक मोडला जात आहे.या विक्रमी गर्दीच्या नियोजनात विखे परिवाराने दाखवलेले व्यवस्थापन आणि नेतृत्व सध्या चर्चेचा विषय ठरले आहे. स्वयंसेवकांचे व्यवस्थापन, भोजन, पार्किंग, बैठक व्यवस्था, पंडाल, माईक सिस्टीम, लाईटिंग या सर्व बाबतीत दाखवलेले उत्कृष्ट नियोजन पाहून स्वतः पंडीत प्रदीप मिश्रा महाराजही भावूक झाले. त्यांनी आपल्या निरूपणादरम्यान दररोज विखे परिवाराच्या नियोजनाचे विशेष कौतुक केले आहे.दुसऱ्या दिवशीच्या प्रवचनात पंडीत प्रदीप मिश्रा महाराज म्हणाले, 'विखे पाटील परिवाराने कार्तिक महिन्यात शिवमहापुराण कथा आयोजित करून भाविकांना लाखो अध्यात्मिक यज्ञाचे पुण्य मिळवून दिले.' महाराजांच्या या विधानाने संपूर्ण परिसरात चर्चेचा विषय निर्माण झाला. हा अध्यात्मिक यज्ञ प्राचीन भारतातील एक धार्मिक आणि राजकीय यज्ञ मानला जातो. त्या यज्ञाद्वारे राजा आपल्या साम्राज्याचे सार्वभौमत्व सिद्ध करीत असे. महाराजांच्या या संदर्भाने कथेचं आध्यात्मिक अधिष्ठान अधिक भव्य स्वरूपात उभं राहिलं असून भाविकांमध्ये या विधानाची मोठी चर्चा रंगली आहे.पंडीत प्रदीप मिश्रा यांनी पुढे सांगितले, 'विखे पाटील परिवाराच्या चार पिढ्यांना जनतेचा आशीर्वाद लाभला आहे. आज सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही कथा यशस्वीरीत्या पार पडत असून, त्यांच्या नियोजनामुळे लाखो भाविकांना दिव्य अनुभव मिळत आहे. महाराजांनी पुढे म्हटले की,धर्म, समाज, राजकारण आणि आयोजन या सर्व क्षेत्रात



सुजय विखे पाटील यांनी समतोल साधला आहे. त्यांनी भक्तीभावातून आयोजन करत सर्व भाविकांचं आशीर्वादरूपी प्रेम मिळवलं आहे.शिर्डी परिसरात लाखोंच्या गर्दीचं नियोजन सुलभतेने करून दाखवल्यामुळे सुजय विखे यांच्या नेतृत्वगुणांची नवी झलक दिसून आली आहे. कथेच्या आयोजनातून विखे परिवाराने समाजातील भक्तिभावाला दिशा दिली असून या आयोजनामुळे शिर्डी परिसरात अभूतपूर्व श्रद्धा आणि शिस्तीचं वातावरण निर्माण झालं आहे. पंडीत प्रदीप मिश्रा महाराजांच्या वाणीतून विखे परिवाराचं कौतुक झाल्यानं ही कथा फक्त आध्यात्मिकच नाही तर सामाजिक आणि व्यवस्थापनाच्या दृष्टीनेही एक आदर्श ठरत आहे.

## आयपीएस पुरण कुमार यांच्या सुसाईड नोटमध्ये

### १३ अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप

खबरदार पुढारी

मुंबई: हरियाणाचे वरिष्ठ पोलीस अधिकारी आयपीएस पूरन कुमार यांच्या आत्महत्येमुळे देशभरात मोठी खळबळ माजली आहे. ७ऑक्टोबर रोजी त्यांनी आपल्या घरातील साऊंडधूफ बेसमेंटम मध्ये सर्व्हिस पिस्तूलाने गोळी झाडून आत्महत्या केली. मात्र मृत्यूनंतरही त्यांचा पोस्टमॉर्टम अद्याप झाला नव्हता, त्याच्या सुसाइड नोटमध्ये त्यांनी १३ वरिष्ठ अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप करत त्यांना जबाबदार ठरवले आहे.पूरन कुमार हे मूळचे आंध्र प्रदेश येथील होते आणि ते अनुसूचित जाती समुदायातून आले होते. आत्महत्येपूर्वी त्यांनी राज्या च्या महानिरीक्षकांवर भेदभाव आणि मानसिक छळाचे आरोप केले होते. त्यांच्या मते, २०२० पासून त्यांच्यावरील अन्याय सुरू झाला होता. त्यांनी म्हटले की, त्यावेळचे डीजीपी मनोज यादव यांनी त्यांच्या बदलीनंतर सतत अपमान आणि छळ केला.सुसाइड नोटमध्ये त्यांनी नमूद केले की काही अधिकाऱ्यांनी त्यांच्या सुट्टया नाकारल्या, वडिलांना भेटण्याची संधी दिली नाही. तसेच त्यांच्या

दहा वर्षात तीन आयपीएस अधिकाऱ्यांच्या आत्महत्या

१) केशशी कुमार २०१२ बॅच आयपीएस अधिकारी, आआंध्र प्रदेशातील पाडेरू येथे एसपी पदावर कार्यरत असताना जून २०१६ मध्ये सर्व्हिस रिव्हॉल्वरने आत्महत्या केली. त्यावेळी त्यांचे वय फक्त २९ वर्षे इतके होते.

२) हिमांश रॉय १९८८ बॅच महाराष्ट्र केडरचे अधिकारी, मुंबई पोलिसांत जॉईट कमिशनर (क्राईम) आणि नंतर एटीएस प्रमुख म्हणून कार्यरत, त्यांनी ११ मे २०१८ रोजी कॅन्सरच्या दीर्घ आजारानंतर आत्महत्या केली.

३) पूरन कुमार हरियाणातील २०१३ बॅच आयपीएस अधिकारी. ७ ऑक्टोबर २०२५ रोजी आत्महत्या: सध्या प्रकरणाची चौकशी सुरू आहे.



विरोधात खोट्धा तक्रारी दाखल केल्या गेल्या, नोव्हेंबर २०२३ मध्ये त्यांच्याकडून सरकारी वाहन देखील काढून घेण्यात आले. आता हा छळ सहन होत नाही, म्हणून मी सगळं संपवण्याचा निर्णय घेतलाय

असं पूरन कुमार यांनी त्यांच्या सुसाईड नोटमध्ये लिहिलंय.मात्र अशा प्रकारची आत्महत्या करणारे पूरन कुमार हे काही पहिलेच आयपीएस अधिकारी नाहीत. त्यांच्या आधीही दोन आयपीएस अधिकाऱ्यांनी आत्महत्या केली आहे.

## पोलिस शिपायासह निवृत्त पोलिस उपनिरीक्षक लाचलुचपतच्या जाळ्यात

खबरदार पुढारी

पुणे : वीजचोरीच्या गुन्ह्यात मदत करण्यासाठी आणि अटक न करण्यासाठी ५ हजारांची लाच स्वीकारणारा कोंढवा पोलिस ठाण्या तील पोलिस शिपाई लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात अडकला आहे. या प्रकरणी कोंढवा पोलिस ठाण्यात पोलिस शिपाया सह त्याला मदत करणाऱ्या एका निवृत्त पोलिस उप निरीक्षका वर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोमनाथ बापू महारनवर (३४ वर्षे, रा. शेवाळ वाडी ता. हवेली) असे लाच लुचपत विभागाच्या जाळ्यात अडकलेल्या पोलिस शिपायाचे नाव आहे तर युवराज कृष्णा फरांदे (५९ वर्षे, रा. उरुळी देवाची, ता. हवेली) असे महारनवर याला मदत करणाऱ्या सेवानिवृत्त पोलिस उप निरीक्षकाचे नाव आहे. लाच लुचपत विभागाने दिलेल्या माहितीनुसार, एका भाडेकरूसह त्याच्या घर मालकावर वीज चोरी चा गुन्हा दाखल आहे. वीज चोरी च्या गुन्ह्यात मदत करण्यासाठी व त्याला अटक न करण्यासाठी महारनवर याने ५ हजार रुपये लाच मागितली. त्यानंतर घर मालकाने महारनवर याला ५ हजार रुपये दिले. या लाचेची चर्चा झाल्यानंतर महारनवर याने भाडेकरूकडे ५ हजारांची मागणी केली व ती रक्कम घर मालकाला देण्यास सांगितले. तसेच सेवानिवृत्त पोलिस उप निरीक्षक फरांदे याने त्यांना फोनवर लाच देण्याची मागणी करत महारनवर याला मदत केली. या बाबत भाडेकरूने लाचलुचपत विभागाकडे तक्रार केली होती. लाच लुचपत विभागाने तक्रारीची पडताळणी केल्यानंतर महारनवर याने लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर लाचलुचपत विभा



गाने सोमवारी कोंढवा पोलिस ठाण्या च्या बाहेर सापळा लावला होता. ठरल्यानंतर तक्रारदार व त्याचा घरमालक पोलिस स्टेशन समोर गेले. त्यावेळी तेथे पोलिस शिपाई महारनवर हाही उपस्थित होता. तक्रारदाराकडून ५ हजारांची लाच स्वीकारताना चपतच्या पथकाने महारनवरला रंगेहाथ पकडले. वरिष्ठ पोलिस निरीक्षकांची तडकाफडकी बदली पोलिस स्टेशन मध्ये किंवा पोलिस ठाण्या च्या हद्दीमध्ये अवैध प्रकार व घडना घडल्यानंतर वरिष्ठ पोलिस आयुक्तां ना जबाबदार धरले जाईल, असा इशारा पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला होता. त्यानंतर कोंढवा पोलिस ठाण्यात लाच स्वीकारण्याची घटना घडली. त्यामुळे पोलिस आयुक्तांनी सोमवारी रात्री पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनय पाटणकर यांची यंत्रण कक्षात बदली केली.तसेच महारनवर व फरादे या दोघांविरोधात कोंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही कारवाई पोलिस उप आयुक्त, पोलिस अधीक्षक शिरीष सरदेश पांडे, पोलिस अधीक्षक अजीत पाटील, अपर पोलिस अधीक्षक अर्जुन भोसले, यांच्या मार्गदर्शना खाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

## पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेला प्रचंड प्रतिसाद, श्रोत्यांची तोबा गर्दी

# एकता, बंधुता, राष्ट्रप्रेम इस्लामी संस्कृतीचे खरे तत्व : फैज खान

खबरदार पुढारी

अहिल्यानगर:इस्लामिक राष्ट्रातील आफ्रिकेतील २५ ते ३० देश गठरीब आहेत. कुवेत व सौदी अरब हे दोनच प्रगत राष्ट्र आहेत. ताजमहल पाहण्यासाठी, क्रिकेट खेळण्यासाठी, गाणे म्हणण्यासाठी, उपचार घेण्यासाठी, चित्रपटात काम करण्यासाठी, उद्योग व व्यवसायासाठी पाकिस्तान व बांगलादेश येथील नागरिक चोरून, लपून भारतात प्रवेश करतात. आपल्याकडे आधार कार्ड, पासपोर्ट, रेशनकार्ड ही सर्व कागदपत्रे आहेत. आपला जन्म भारत देशात झाला आहे ही भाग्याची गोष्ट आहे.इंडोनेशियाचे राष्ट्रपती संयुक्त राष्ट्र सभेत रामलीला, रामायण, गीता, शांती मंत्र सांगतात. इंडोनेशिया हा मुस्लिम बहुल देश असून देखील ते आपली संस्कृती परंपरा विसरत नाहीत. त्याच पद्धतीने होळी, दिवाळी, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, गणेशोत्सव, गुढीपाडवा, महाशिवरात्र ही भारताची संस्कृती व परंपरा आहे. देशाची संस्कृती व परंपराचे जतन केले तर भारत देशाचा विश्वगुरू म्हणून जगात डंका वाजेल.**कट्टरपंथी, जिहादी प्रवृत्तीचे लोक थापा**देऊन देशाच्या विरोधी कारवाई करण्यासाठी सामान्य नागरिकांना भडकवीत आहेत. बॉम्बस्फोट करून काफिरांना मारले. तर तुम्हाला स्वर्ग मिळेल. तुमच्या नशिबी ७२ हूर मिळतील. हे सर्व इस्लामी तत्त्वज्ञानात सांगितलेले नाही. ही क प्रथा बंद करण्यासाठी अहिल्यानगर येथून आपण समाज प्रबोधनाचे कार्य करीत आहोत. स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, महात्मा फुले यांनी देशातील सतीची चाल, बालविवाह यासारख्या क प्रथा बंद केल्या आहेत.सावेडी येथील



माऊली सभागृहात पंडित दीनदयाळ पतसंस्था व पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या वतीने व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. 'एकता, बंधुता, राष्ट्रप्रेम इस्लामी संस्कृतीचे खरे तत्व' या विषयावर मुस्लिम मंच चे अध्यक्ष फैज खान यांनी व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफले. याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. प्रशांत भालेराव,, पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन वसंत लोढा, मानद सचिव विकास पाथरकर, दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय तागडे, महासचिव बाळासाहेब भुजबळ, उपाध्यक्ष अनुराग धूत, अशोक कानडे, मनीष सोमानी, उद्योजक सुहास फुंदे, सुरज अग्रवाल, अनिरुद्ध देवचक्के, मिलिंद गंधे, राजकुमार जोशी,सहसचिव राहुल जामगावकर, शामराव वागस्कर, सीए ज्ञानेश कुलकणी, सीए राजेंद्र काळे, राजेंद्र चोपडा, केके शेट्टी, अजित कृष्णन, डॉ. प्रकाश कांकरिया, सुधाताई कांकरिया, निलेश लोढा, शारदा होशिंग, बाबासाहेब साठे, शैला चंगडे, कुलदीप सिंह, दिप्ती नायर, राजमुद्रा अकॅडमीच्या संचालिका नंदाताई पांडुळे, पुणे येथील किरण ढोरे, अविनाश शितोळे, पतसंस्थेचे व्यवस्थापक निलेश लाटे, सह व्यवस्थापकसुखदेव दरेकर आदी उपस्थित होते. प्रशांत भालेराव म्हणाले, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रंप यांनी भारतीय वस्तूंवर ५०% टेरिफ वाढवले. यामुळे अमेरिकेतील बाजारपेठेतभारताची शंभर रुपयांची वस्तू दिडशे रुपयाला विकली जाऊ लागली. चालू आर्थिक वर्षी ७.२ कोटी लाख रुपयांची निर्यात थांबल्याने भारताचा विकासाचा दर सहा टक्क्यांचा आत येणार होता. अमेरिकेचे असे म्हणणे होते की रशियाकडूनतेल घेऊ नका. रशिया हा पैसा युक्रेनच्या युद्धात वापरत आहे. रशिया आणि इराणकडून मिळणारे तेल हे कमी दरात मिळत असल्याने भारताची अर्थव्यवस्था स्थिर होण्यासाठी मदत होत आहे. याला उत्तर म्हणून भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वदेशी वस्तूंचा वापर करा. असे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देत भारतीयांनी वीस ते पंचवीस टक्के स्वदेशी वस्तूंचा वापर सुरू केला. तसेच कोणताही गाजावाजा न करता २८ टक्क्यावरून अठरा टक्क्यांवर जीएसटी कमी केला. यामुळे बाहेरून येणाऱ्या वस्तू महाग झाल्या परंतु भारतीय वस्तू कमी दरात उपलब्ध झाल्याने भारतीय अर्थव्यवस्थेत सुधारणा झाली आहे.वसंत लोढा प्रास्ताविकात म्हणाले, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी सांगितल्याप्रमाणे, पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे, ८० कोटी ठेवी आहेत. यंदाच्या वर्षी संघशताब्दी वर्षाच्या निमित्ताने १०० कोटींचे उद्दिष्ट ठेवले आहे. याला प्रतिसाद म्हणून उद्योजक राजेंद्र चोपडा यांनी एक कोटी रुपयांचा धनादेश व केके शेट्टी यांनी ५० लाख रुपयांच्या धनादेश देऊन ठेव पावती केली आहे. व्याख्यानमालेला उदंड प्रतिसाद दिल्याबद्दल अहिल्यानगर वासियांचे मनःपूर्वक आभार.

दैनिक खबरदार पुढारी हे मालक मुद्रक प्रकाशक संपादक दतात्रय पोपटराव खेमनर यांनी तिरंगा प्रिंटर्स अहमदनगर येथे छापून फत्याबाद ता. श्रीरापूर जि. अहमदनगर येथे प्रकाशित केले.(पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील)मो. ९०९६२००२७५(वादविवाद श्रीरापूर न्यायकक्षेत)
दैनिक खबरदार पुढारी मुख्य कार्यालय श्रीरामपूर संपर्क क्रमांक ९०९६२००२७५ ऑफिस नंबर ०२४२२२२०२२० विभागीय कार्यालय नव नागापूर एमआयडीसी ४ ब्लॉक अहिल्यादेवी नगरइमेल khabardaroudhari@gmail.com खासगी वितरणासाठी